सं.फौ. केस नंबर १८९/२०२१
शासन वि. मोहन
निशाणी नंबर **१२**

# दोषारोप

मी, **एस.एस. कळसकर**, प्र.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोहारा खालीलप्रमाणे तुमचेवर दोषारोप निश्चित करतो **:–**

आरोपी :- **मोहन रामराव कदम**,
वय ४९ वर्ष, धंदा – चालक,
रा. रेबेचिंचोली, ता. लोहारा,
जि. उस्मानाबाद.

**येणेप्रमाणे,**

**१)** पहीले असे की, दिनांक ३०/०१/२०२१ रोजी सायंकाळी ५.३० ते ६.०० वाजणेच्या दरम्यान मौजे माकणी ता. लोहारा शिवारात माकणी ते लोहारा जाणारे रोडवर वामन सुरवसे यांच्या शेताजवळ, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद, तुम्ही तुमच्या ताब्यातील मोटारसायकल क्रमांक एम.एच. २५-ए.जी.-६०५२ ही निष्काळजीपणाने किंवा हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवुन फिर्यादीची आई व भगीरथी कांबळे यांना पाठीमागुन धडक देवुन अपघात केला, व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान **कलम २७९** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

**२)** दुसरे असे की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणाने किंवा हयगयीने चालवून फिर्यादीची आई व भगीरथी कांबळे यांना किरकोळ जखमा करण्यास कारणीभुत झालात, व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान **कलम ३३७** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

**३)** तिसरे असे की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणाने किंवा हयगयीने चालवून फिर्यादीची आई व भगीरथी कांबळे यांना गंभीर जखमा करण्यास कारणीभुत झालात, व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान **कलम ३३८** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

४)	शेवटी असे की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर अतिवेगात चालविली, व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन अधिनियमाचे **कलम १८४** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

'आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपाबद्दल तुमचेवर या न्यायालयात खटला चालवण्यात यावा.'

सही/-

दिनांक : १८-०८-२०२३.

**( श्री.एस.एस. कळसकर )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, लोहारा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

दोषारोपातील मजकुर आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचून दाखविण्यात आला, तो त्याने नाकबुल करुन प्रकरण पुढे चालवण्याची विनंती केली.

सही/-

दिनांक : १८-०८-२०२३.

**( श्री.एस.एस. कळसकर )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, लोहारा.